**एम.ए.सी.पी. नं.१९ /२०२०** **निशाणी क्र.**

**पुढील उलटतपास शपथेवर सुरु सामनेवाला क्र.३ तर्फे विधीज्ञ श्री. गाली यांचेकडून :**

१. हे म्हणणे खरे नाही की, कर्मचा-यांचे पगार बॅंक खात्यात जमा झाले. हे म्हणणे खरे आहे की आज दाखल केलेल्या कागदपत्रांसोबत मी कलम ६५ बी चे प्रमाणपत्र जोडलेले नाही.

यावेळी अर्जदाराचे विद्वान विधीज्ञांनी असे प्रतिपादन केले की सामनेवाल्याने साक्षीदाराने दाखल केलेल्या कागदांबाबत प्रश्न विचारल्यामुळे त्यास निशाणी देण्यात यावी.

**आदेश :** सामनेवाल्याने दाखल केलेल्या कागदपत्रांबाबत प्रश्न नसून कलम ६५ बीचे प्रमाणपत्र दाखल केले किंवा नाही असा प्रश्न असल्यामुळे त्या कागदास निशाणी देता येणार नाही.

२. मी आज सोबत कॅशबुक आणलेले नाही. रोखीने पगार करण्याकरीता आम्हाला बॅंकेतून त्या पगाराची रक्कम काढण्याची गरज भासत नाही. एका महीन्यात किती रोख जमा होते हे मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की रोखीने पगार आम्ही व्हाउचरद्वारे देतो. आज ते व्हाउचर आणलेले नाही. आम्ही आयकर भरतो. आज मी आयकरचे विवरणपत्र सोबत आणलेले नाही. जखमीला दिलेला पगार आम्ही आयकरच्या विवरणपत्रात दाखवला किंवा नाही हे मला सांगता येणार नाही. मला साक्ष समन्स मिळाला होता. हे मला माहिती नाही की जखमीने तांत्रिक शिक्षण घेतले होते किंवा नाही. हे मला सांगता येणार नाही की, जानेवारी २०२० नंतर जखमी आमच्याकडे कामाला होता किंवा नाही. हे मला माहिती नाही की, जखमी आमच्याकडे हंगामी स्वरुपाचे काम करत होता. हे मला सांगता येणार नाही की, रॉयल एनफिल्ड नेवासकर ऑटोमोबाईलने जखमीला नियुक्तीपत्र दिले होते किंवा नाही. हे म्हणणे खरे नाही की, जखमीला जास्तीची रक्कम मिळावी म्हणून मी खोटी साक्ष देत आहे.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृती,

**( ए. एम. पाटील )**

दिनांक : १७.०७.२०२५

सदस्य, मोटार अपघात प्राधिकरण,
अहमदनगर.